(14)

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
## राहुरी जि.अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक : (०२४२६) २४३३७४ फॅक्स क्रमांक : (०२४२६) २४३३७४ /२४३२३८
e.mail : comptroller.mpkv@gov.in/ comptmpkv@gmail.com /ac2mpkv@gmail.com

जा.क्र.मफुकृवि/ नियंत्रक/लेखा-२/परिपत्रक/ ५४१ /२०१७ दिनांक- ७/०९/२०१७

**अत्यंत महत्वाचे**

### परिपत्रक

**विषय :- वेतनेतर खर्चात काटकसर करणेबाबत व वस्तु / सेवा खरेदीसाठी GeM (Govt. e Market) या पोर्टलचा वापर करणेबाबत.**

संदर्भ :- १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दि .३०.०६.२०१७
२) शासन पत्र क्रमांक कृषिवि -३७१७/प्र.क्र.४०/८ अे दि. ११.०७.२०१७
३) शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि. २४.०८.२०१७

अ] (i) उपरोक्त संदर्भान्वये विद्यापीठातील सर्व योजना प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी आणि अधिदान व लेखा अधिकारी यांना कळविण्यात येते की, राज्य शासनाने वेतनेतर खर्चाच्या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी व काटकसरीने खर्च करण्यासाठी संदर्भ ०१ नुसार सविस्तर सुचना दिल्या आहेत. त्यांचे सखोल अवलोकन व्हावे. ( तसेच राज्य शासनाने माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ साठीच्या वेतनेतर सादील अनुदानात रू. १.१७ कोटींची कपात करून, सदर अनुदान परत घेतले आहे याची नोंद घ्यावी)

(ii) भा.कृ.अ.प., नवी दिल्ली यांनी देखील समक्ष बैठकीमध्ये साधारणत: ३० टक्के अनुदान कपातीचे संकेत दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या ज्या खर्चाच्या बाबी राज्य शासन व भा.कृ.अ.प. अनुदानित निधीवर अवलंबून होत्या त्यांचा लक्षणिय भार विद्यापीठाच्या महसूली उत्पन्नावर होईल. याबाबत गांभीर्याने व साकल्याने विचार करून प्रत्येक खर्चाच्या बाबीत काटकसर अवलंब करावा.

(iii) शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानात कपात होत असल्याने विद्यापीठ महसूली उत्पन्नातून कोणतेही अतिरिक्त अनुदान उपलब्ध होणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ब] वरील संदर्भीय- ३ चे शासन निर्णयाअन्वये गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लेस (GeM) या पोर्टलच्या वापरामुळे शासकीय विभागाद्वारे होणा-या खरेदी प्रक्रियेच्या कालावधीमध्ये बचत, उत्कृष्ठ वस्तूंचा पुरवठा, वाजवी किंमत व संपूर्ण खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणार आहे. विद्यापीठातंर्गत सर्व वस्तु / सेवांचे संपादन (खरेदी) या शासन निर्णयान्वयानेच करावी. या GeM Portal वर उपलब्ध सेवा / वस्तूंची त्या Portal वरील नमूद दरांपेक्षा अधिक दराने कुठल्याही परिस्थितीत खरेदी करू नये.

क] सबब, शासनाच्या वरील संदर्भीय परिपत्रक व शासन निर्णयातील निर्देश विचारात घेवून काटकसरीने खर्चाचे नियोजन करावे व GeM Portal चा पूर्णत: वापर करावा.

सोबत शासनाचे संदर्भीय परिपत्रक व शासन निर्णयाची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी जोडण्यात आली आहे.

नियंत्रक
म.फु.कृ.वि., राहुरी

सोबत : वरील प्रमाणे